# महाराष्ट्र विधानसभा

## पहिले अधिवेशन, २०१७

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**शुक्रवार, दिनांक ३१ मार्च, २०१७ / चैत्र १०, १९३९ ( शके )**

| | | |
|---|---|---|
| **(१)** | **आदिवासी विकास मंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |
| **(२)** | **उद्योग व खनिकर्म मंत्री** | |
| **(३)** | **ऊर्जा, नवीन व नवीकरणीय ऊर्जा, राज्य उत्पादन शुल्क मंत्री** | |
| **(४)** | **सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्य मंत्री** | |
| **(५)** | **सहकार, पणन आणि वस्त्रोद्योग मंत्री** | |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - २२**

---

**वरुड व तिवसा (जि.अमरावती) येथील अपंग, निराधार, विधवा तसेच इंदिरा गांधी राष्ट्रीय वृध्दापकाळ योजनेच्या लाभार्थ्यांना अनुदान न मिळाल्याबाबत**

**(१) * ७७००५ अॅड.यशोमती ठाकूर (तिवसा), डॉ.अनिल बोंडे (मोर्शी) :** सन्माननीय **विशेष सहाय्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वरुड (जि.अमरावती) तालुक्यातील २३० अपंग, निराधार, विधवा, परित्यक्ता, घटस्फोटित महिला यांना माहे जून, २०१६ ते माहे सप्टेंबर, २०१६ या चार महिन्यांचे अनुदान देण्यात आले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजनेच्या अनुदानाच्या मागणी अर्जावर कोर्ट फी स्टॅम्प लावण्याची आवश्यकता नाही असे शासनाने स्पष्ट केले असतानाही संबंधित अधिकारी शासनाच्या आदेशाचे पालन करत नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच तिवसा (जि.अमरावती) येथील लाभार्थीना इंदिरा गांधी राष्ट्रीय वृध्दापकाळ योजनेचे माहे मार्च, एप्रिल व मे, २०१६ चे अनुदान अद्यापही शासनाकडून प्राप्त झाले नसल्याबाबत मा.स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा. नायब तहसीलदार तिवसा सं.गा.यो.यांना दिनांक १२ मे, २०१६ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदन दिले आहे हे खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत चौकशी करून पुढे कोणती कार्यवाही तथा कारवाई केली,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) हे खरे नाही.

वरुड (जि. अमरावती) तालुक्यातील लाभार्थीना माहे मे व जून या दोन महिन्याचे अनुदान दि २०.७.२०१६, माहे जुलै महिन्याचे अनुदान दि २०.८.२०१६, माहे ऑगस्ट चे अनुदान दि २०.९.२०१६, माहे सप्टेंबर २०१६ चे अनुदान दि.२५.१०.२०१६ रोजी अदा करण्यात आलेले आहे.

(२) हे खरे नाही.

(३) स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी नायब तहसिलदार (संगायो) तिवसा, यांना दि.१२.५.२०१६ रोजी निवेदन दिले, हे खरे आहे.

तथापि तिवसा (जि.अमरावती) येथील इंदिरा गांधी राष्ट्रीय वृध्दापकाळ निवृत्तीवेतन योजनेच्या लाभार्थिना माहे मार्च व एप्रिल २०१६ चे अनुदान दि ६ जून २०१६ रोजी तसेच माहे मे २०१६ चे अनुदान दि.१८ जून २०१६ रोजी ऑनलाईन पध्दतीने CPSMS पोर्टलद्वारे वितरीत करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्य सहकारी बँकेमधील गैरव्यवहाराची चौकशी पूर्ण न झाल्याबाबत

**(२) * ७३९८१ श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत), श्री.सरदार तारासिंह (मुलुंड), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे**

**पूर्व), श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य सहकारी बँकेतील १५०० कोटी रुपयांच्या गैरव्यवहाराची चौकशी २५ ते ३० महिने होऊनही पूर्ण झाली नसल्याची बाब दिनांक १९ जानेवारी, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अप्पर निबंधक श्री. शिवाजी पहिनकर यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या चौकशी समितीला तीन वेळा मुदतवाढ देऊनही परत मुदत वाढवून मिळावी असा विनंती अर्ज शिवाजी पहिनकर यांनी शासनाकडे केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सहकार अधिनियम १९६० नुसार चौकशीची कार्यवाही किती कालावधीत पूर्ण करण्याची तरतूद करण्यात आली आहे,

(४) असल्यास, सदरची चौकशी लवकरात लवकर पूर्ण होण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची काय कारणे आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख :** (१) होय.

(२) होय.

(३) सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे या कार्यालयाच्या दि.२२/५/२०१६ च्या पत्रान्वये सदरची चौकशी पूर्ण करण्याकरीता दि.२२/११/२०१६ पर्यंत मुदतवाढ दिलेली आहे. चौकशी अधिकारी यांनी दि.२४/१०/२०१६ च्या पत्रान्वये चौकशी पूर्ण करण्यास व अहवाल सादर करण्यास दि.२२/११/२०१६ पासून एक वर्षाची मुदतवाढ मिळणेबाबत विनंती केलेली आहे.

(४) चौकशीची व्याप्ती मोठी असल्याने प्राधिकृत अधिकारी यांनी मुदतीत कार्यवाही पुर्ण करता येत नसल्याचे कळवून सदरची चौकशी पुर्ण करण्यासाठी मुदतवाढ मिळण्याची विनंती केली आहे. याप्रकरणी विहीत कालावधीतही चौकशी पुर्ण न झाल्याने चौकशी पुर्ण करण्यासाठी मुदतवाढ मिळण्याबाबत प्रस्ताव सहकार आयुक्तांकडून शासनास प्राप्त झाला असून तो शासनाच्या विचाराधीन आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**वाशिम जिल्हयातील पैनगंगा नदीवर उभारलेल्या बॅरेजमधील पाणी वीजेअभावी सिंचनाकरिता वापरता येत नसल्याबाबत**

**(३) * ८१४४१ डॉ.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाशिम जिल्हयातील सिंचनाचा वाढता अनुशेष कमी करण्यासाठी शासनाने पैनगंगा नदीवर ११ ठिकाणी ७१६.४२ कोटी रुपये खर्च करुन बॅरेज उभारले परंतु वीजेअभावी यातील पाणी सिंचनाकरिता वापरता येत नसल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने याची चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास, तातडीने वीज पुरवठा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे आहे.

(२) वाशिम जिल्हयामध्ये जलसंपदा विभागातर्फे पैनगंगा नदीवर ११ नवीन बंधारे बांधण्यात आले असून, अनेक लघुपाटबंधारे योजना व उपसा सिंचन योजना पूर्णत्वास येत आहेत. सदर योजनेच्या अनुषंगाने, ८००० संभाव्य कृषीपंपाची मागणी येण्याची शक्यता असल्याचे आढळून आले आहे.

(३) वाशिम जिल्हयातील सदर संभाव्य ८००० कृषीपंपाना वीज पुरवठा देण्याच्या उद्देशाने पायाभूत सुविधा उभारणेकरिता लागणारा रु. ९५.८९ कोटी इतका निधीचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**डोंबिवली एम.आय.डी.सी.तील कारखानदार नियमांचे उल्लंघन करत असल्याबाबत**

**(४) * ८१६०९ डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डोंबिवली औद्योगिक परिसरातील १३४ कारखानदार बांधकाम पुर्णत्वाचा

दाखला न घेताच अनेक वर्ष व्यवहार करत असल्याचे दिनांक २६ डिसेंबर, २०१६ रोजी वा त्या त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी औद्योगिक विभागाने ऑक्टोबर पुर्वी बांधकाम पुर्णत्वाचे दाखले सादर करण्याचे आदेश दिल्यानंतरही कारखानदारांनी प्रतिसाद दिला नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने सदर कारखानदारांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई :** (१) डोंबिवली औद्योगिक क्षेत्रामधील एकूण भूखंडांपैकी २४ औद्योगिक,१४ व्यापारी व २५ निवासी भूखंडधारकांनी इमारत पूर्णत्वाचा दाखला (बीसीसी) न घेतल्याचे निदर्शनास आले आहे.
(२) होय. हे खरे आहे.

सदर ६३ भूखंडधारकांना उद्योग संजीवनी योजना-२०१५ चा लाभ घेण्याबाबत कळविण्यात आले होते. तथापि एकाही भूखंडधारकांने सदर योजनेचा लाभ घेतलेला नाही.
(३) ज्या भूखंडधारकांनी इमारत पूर्णत्वाचा दाखला प्राप्त केलेला नाही, त्यांच्यावर महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम १९६१, MRTP व महाराष्ट्र फायर सर्व्हिस ॲक्ट -२००६ मधील तरतुदीनुसार आवश्यक कार्यवाही करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## दर्यापूर भागातील (जि.अमरावती) इन्फ्रा-२ योजनेंतर्गतची कामे मे.कौस्तुभ इंजिनिअरिंग, औरंगाबाद या कंपनीने अपूर्ण ठेवल्याबाबत

**(५) * ८१९५२ श्री.रमेश बुंदीले (दर्यापूर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) दर्यापूर भागातील (जि.अमरावती) इन्फ्रा-२ योजने अंतर्गतची कामे मे.कौस्तुभ इंजिनिअरिंग, औरंगाबाद या कंपनीला गेल्या २ वर्षांपासून देण्यात आली असून त्यातील नवीन रोहित्र बसविणे, लखाड सबस्टेशन निर्मिती करणे इ. कामे प्रलंबित आहेत, हे खरे आहे काय,

(२) तसेच, सदर योजनेची कामे मागील २ वर्षापासून कंपनीने अपूर्ण ठेवल्याने शेतक-यांच्या कृषी पंपांना वीज उपलब्ध न झाल्याने त्यांचे आर्थिक नुकसान होत आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कामात दिरंगाई करणा-या या कंपनीवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) महावितरण कंपनीने अचलपूर विभागाकरीता इन्फ्रा-२ योजनेच्या कामाचे कंत्राट निविदा प्रक्रियेव्दारे मे. कौस्तुभ इजिनियरिंग, औरंगाबाद यांना दिनांक १७ जानेवारी, २०१५ मध्ये दिले होते. सदरचे काम जानेवारी, २०१७ पूर्ण करावयाचे होते. परंतु कंत्राटदाराने माईलस्टोन प्रमाणे कामे न केल्यामुळे सदर कंत्राट दिनांक ०१.०६.२०१६ रोजी अंशत: रद्द करुन हाती घेतलेली कामे आता मार्च,२०१७ पर्यंत पूर्ण करण्यास परवानगी देण्यात आली आहे. तसेच त्यांनी हाती न घेतलेल्या कामाच्या एकूण रु.२६.७८ कोटीच्या ११ निविदा अमरावती परिमंडळाने काढून कामाचे आदेश ऑगस्ट,२०१६ मध्ये देण्यात आले. सदर कामे प्रगतीपथावर आहेत. मे. कौस्तुभ इंजिनिअर्स, यांना कामास विलंब झाल्यामुळे कंत्राटाच्या नियमाप्रमाणे दंड आकारण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## अमरावतीमधील इंग्रजी माध्यमाच्या शासकीय निवासी आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना निकृष्ट दर्जाचे भोजन दिले जात असल्याबाबत

**(६) * ८३०९५ श्री.राजु तोडसाम (अर्णी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावतीमधील कठोरा मार्गावरील इंग्रजी माध्यमाच्या शासकीय निवासी आश्रमशाळेतील इयत्ता पहिली ते सातवीपर्यंतच्या आदिवासी विद्यार्थ्यांना निकृष्ट दर्जाचे भोजन दिले जात असल्याचे माहे डिसेंबर, २०१६ मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी संबंधित कंत्राटदाराला काळ्या यादीत टाकण्यात आले असून आश्रमशाळेच्या मुख्याध्यापक व अधिक्षक यांची शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) उक्त चौकशीच्या अनुषंगाने मुख्याध्यापक व अधिक्षकांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,तसेच योग्य व पोषक आहार पुरविण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) इंग्रजी माध्यमाची शासकीय आश्रमशाळा, अमरावती येथील भोजन कंत्राटदाराकडुन विद्यार्थ्यांना पुरविण्यात येणारे भोजन मेन्युप्रमाणे व पुरेसे नसल्याची बातमी दै.लोकमत मध्ये दिनांक ०५/१२/२०१६ रोजी प्रसिध्द झाली होती, हे खरे आहे.

(२), (३) व (४) प्रकरणी अपर आयुक्त, अमरावती यांच्या कार्यालयामार्फत चौकशी करण्यात आलेली आहे. चौकशी अहवालातील अभिप्रायांनुसार पूर्वीचा भोजन ठेका रद्द करुन नवीन भोजन कंत्राटदारास भोजन पुरवठ्याचे कंत्राट देण्यात आलेला आहे. सद्यस्थितीत आहार प्रणालीनुसार भोजन पुरवठा सुरळीत सुरु आहे. संबंधीत आश्रमशाळेचे अधिक्षक यांना अपर आयुक्त, अमरावती यांच्या दि. ७/१२/२०१६ रोजीच्या आदेशान्वये निलंबित करण्यात आलेले आहे. तर मुख्याध्यापक यांची दि. १४/१२/२०१६ च्या ज्ञापनान्वये विभागीय चौकशी सुरु करण्यात आली आहे.

-----------------

## महावितरण कंपनीने आयपीडीएस अंतर्गत १०० कोटींच्या कामांना मंजूरी दिल्याबाबत

**(७) * ७७६८१ श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महावितरणतर्फे ठाणे, भिवंडी, वाशी या भागातील वीज पुरवठा सुरळीत करण्याकरिता आयपीडीएस योजनेतंर्गत १०० कोटींच्या कामांना मंजूरी देण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निधीमधून ठाणे, भिवंडी, वाशी या भागातील वीज भारनियमन संपुष्टात आणण्यासाठी कोणती कामे करण्यात येणार आहेत तसेच सद्यस्थितीत शहराच्या वाढलेल्या लोकसंख्येमुळे तीनही शहरास किती दाबाच्या

वीज वाहकांमधून वीज पुरवठा करण्यात येत आहे, तसेच सदरहू भागात पुरेशा प्रमाणात वीज पुरवठा करण्यासाठी किती क्षमतेच्या केबलची आवश्यकता आहे,
(३) असल्यास, यासंदर्भात महावितरणने आतापर्यंत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत व याबाबतच्या कामांची सद्यस्थिती काय आहे ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे आहे.
(२) सद्यस्थितीत ठाणे व मुंबई (मुलुंड व भांडूप विभाग), भिवंडी व वाशी या तिन्ही मंडळाच्या क्षेत्रात भारनियमन करण्यात येत नाही. तसेच सदर मंडळाच्या क्षेत्रातील विद्युत प्रणाली अधिक सक्षम करण्याकरिता ३३/११ केव्हीची २ नवीन उपकेंद्रे, ३३/२२/११ केव्हीची ७७.७५ कि.मी. भूमिगत वाहिनी, १८६ कि.मी. लघुदाब भूमिगत वाहिनी, ७८ नवीन वितरण रोहित्र तसेच १६७ वितरण रोहित्रांची क्षमतावाढ करण्याची कामे मंजूर करण्यात आलेली आहेत.

सदर भागात पुरेशा प्रमाणात वीज पुरवठा करण्यासाठी ३ कोअर/३०० चौ.मी.मी. व ३ कोअर/ ४०० चौ.मी.मी.केबलची आवश्यकता असून सदर केबलद्वारे वीजपुरवठा करण्यात येतो.
(३) व (४) उपकेंद्र, केबल व लाईन्स, वितरण रोहित्र, लघुदाब व उच्चदाब वाहिन्या या कामांच्या निविदा प्रक्रिया प्रगतीपथावर आहेत.

-----------------

**करमाळा (जि.सोलापूर) तालुक्यातील आदिनाथ सहकारी कारखान्यांच्या कर्मचाऱ्यांना वेतन थकीत असतांना कार्यमुक्त करण्यात आल्याबाबत**

**(८) * ८०८९३ श्री.नारायण पाटील (करमाळा) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सोलापूर जिल्हयातील करमाळा तालुक्यातील आदिनाथ सहकारी कारखान्यांच्या संचालक मंडळाने कायम असलेल्या कर्मचा-यांना त्यांचा १८ महिन्यांचा पगार थकीत असतांना माहे ऑगस्ट, २०१७ अखेरपर्यंत तात्पूरते एका हंगामासाठी माहे डिसेंबर, २०१६ मध्ये कार्यमुक्त केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू कर्मचा-यांशी चर्चा न करता तसेच त्यांच्या थकीत पगारातील १८ कोटीची रक्कम न देता, उपरोक्त निर्णय घेण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी करुन संबंधित साखर कारखान्यावर कोणती कारवाई केली आहे व कर्मचाऱ्यांचा थकीत पगार तातडीने मिळवून देण्यासाठी कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत,

(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख :** (१) होय.

(२) अंशत: खरे आहे. कारखान्याच्या दिनांक ११/१२/२०१६ रोजीच्या संचालक मंडळ सभेमध्ये सर्व कर्मचारी कामगार संघटना प्रतिनिधी यांचेशी समक्ष चर्चा होऊन कारखाना विहीत कालावधीकरीता बंद ठेवणे तसेच कर्मचाऱ्यांच्या पगाराचे अनुषंगाने ठराव क्रमांक १ पारीत करण्यात आला आहे. त्यानुसार कारखान्याने करमाळा तालुका सहकारी व खाजगी साखर कारखाना कामगार संघटना (इंटक) तालुका करमाळा यांचेशी दिनांक ११/१२/२०१६ रोजी करार करुन त्याबाबत सहायक कामगार आयुक्त, सोलापूर व अपर कामगार आयुक्त, पुणे यांना कळविले आहे. माहे नोव्हेंबर, २०१६ अखेर कर्मचाऱ्यांचे वेतनापोटी सुमारे रुपये ११०४.३२ लाख इतकी रक्कम थकीत आहे.

(३) कारखान्याकडे ५९२८४ क्विंटल साखर साठा शिल्लक असून सदर साखर विक्री व रक्कम उपलब्धतेनुसार कर्मचाऱ्यांचा थकीत पगार अदा करण्याचे कारखान्याचे नियोजन आहे.तसेच थकीत पगार व फरकाचे तीन हप्ते संस्थेच्या आर्थिक परिस्थितीनुसार देण्यात येतील असे करारात नमूद केले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सोलापूर जिल्हा मध्यवर्ती बँकेची बिगरशेतीसाठी दिलेली रक्कम संस्थांकडे थकित असल्याबाबत

**(९) * ८१५६७ श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्हा मध्यवर्ती बँकेची बिगरशेतीसाठी दिलेली ६५६ कोटी ४२ लाख ८५ हजार रुपये इतकी रक्कम २७ संस्थांकडे थकित असून ती रक्कम भरणा होत

नसल्याचे माहे फेब्रुवारी,२०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ६३८ कोटी इतकी रक्कम ८० हजार शेतकरी भरण्यास तयार नसल्याने थकबाकीची रक्कम वाढत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू थकबाकी वसुल करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख :** (१)अंशत: खरे आहे.

(२) अंशत: खरे आहे.

(३) बँकेने थकबाकी वसुलीसाठी खालीलप्रमाणे कार्यवाही केलेली आहे.

i) २७ संस्थांच्या येणेबाकी वसुलीसाठी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ९१ खाली १८ संस्थांचे रू.३५८.९१ कोटींचे दावे मा.सहकार न्यायालय, सोलापूर येथे दाखल केले असून त्यासंदर्भात सुनावणी चालू आहे.

ii) सरफेसी कायद्यानुसार १० संस्थांना कलम १३(२) व १३(४) च्या नोटीसा देऊन ४ संस्थांच्या रु.४३.७१ कोटीच्या स्थावर व जंगम मालमत्तेचा ताबा बँकेस मिळाला आहे.

iii) ४ संस्थांनी बँकेची फसवणूक केली आहे, असे निदर्शनास आल्याने त्या ४ संस्थांवर एफ.आय.आर.दाखल केले आहेत.

iv) शेती कर्जाच्या थकबाकी वसुलीसाठी प्राथमिक विविध कार्यकारी संस्थांनी १७२८४ थकबाकीदारांवर महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १०१ अन्वये प्रकरणे केली आहेत. थकबाकीदार सभासदांकडून वसुलीची कार्यवाही चालू आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

## अकोला जिल्ह्यातील मागासवर्गीय व आदिवासी मुला-मुलींच्या शासकीय वसतिगृहातील विद्यार्थ्यांना निकृष्ट भोजन दिले जात असल्याबाबत

**(१०) * ८२६५३ श्री.गोवर्धन शर्मा (अकोला पश्चिम), श्री.राजेंद्र पाटणी (कारंजा), श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला शहर व जिल्ह्यातील मागासवर्गीय व आदिवासी मुला-मुलींच्या शासकीय वसतिगृहातील विद्यार्थ्यांना निकृष्ट भोजन दिले जात असल्याचे माहे फेब्रुवारी, २०१७ च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,शासकीय वसतिगृहाच्या विद्यार्थ्यांना उत्कृष्ट भोजन देण्याबाबतचा शासन निर्णय आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अकोला शहर व बार्शीटाकळी येथील वस्तीगृहाच्या विद्यार्थ्यांनी निकृष्ट भोजनाबाबत जिल्हाधिकारी, समाजकल्याण आयुक्त यांच्याकडे तक्रार केल्यानंतरही कोणतीही सुधारणा करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याप्रकरणी चौकशी करून विद्यार्थ्यांना निकृष्ट भोजन देणा-या कंत्राटदारावर व संबंधित अधिका-यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) नाही, हे खरे नाही.

(२) होय, हे खरे आहे.

(३) नाही, हे खरे नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नारा (ता.कारंजा, जि.वर्धा) येथे यादवराव केचे आदिवासी आश्रमशाळेतील विद्यार्थ्याच्या आकस्मित मृत्यूबाबत

**(११) * ८२०७५ श्री.अमर काळे (आर्वी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नारा (ता.कारंजा,जि.वर्धा) येथील यादवराव केचे आदिवासी आश्रमशाळेतील आकाश काडमु बेठेकर या विद्यार्थ्याची दिनांक ८ फेब्रुवारी २०१७ रोजी रात्री आठ वाजता अचानक प्रकृती बिघडल्याने त्याला ग्रामीण रूग्णालयात भरती करण्यात आले असता त्याचा औषधोपचारादरम्यान मृत्यू झाला असल्याची माहिती दि.१० फेब्रुवारी २०१७ रोजी निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर आश्रमशाळेतील प्रशासनाच्या गैरकारभार व बेजबाबदारपणामुळे विद्यार्थ्याचा मृत्यू झाला असल्याची लेखी तक्रार पोलीस ठाण्यात आणि आदिवासी विभागात करण्यात आल्यानंतर सुध्दा अद्यापही चौकशी करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या गंभीर प्रकरणी शासनाने चौकशी न करण्याची कारणे काय आहेत, तसेच या प्रकरणी दिरंगाई करणा-या आश्रमशाळेच्या प्रशासनावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) स्व.यादवरावजी केचे अनुदानित आश्रमशाळा नारा, ता.कारंजा, जि.वर्धा येथील निवासी विद्यार्थी आकाश काडमु बेठेकर, इयत्ता ३ री ह्या विद्यार्थ्याचा दि.०९.०२.२०१७ रोजी ग्रामीण रुग्णालय, कारंजा, जि.वर्धा येथे औषधोपचारादरम्यान मृत्यू झाला, हे खरे आहे.

(२) आश्रमशाळेच्या प्रशासनाच्या गैरकारभार व बेजबाबदारपणामुळे विद्यार्थ्याचा मृत्यू झाला असल्याची लेखी तक्रार करण्यात आलेली नाही. तथापि, विद्यार्थी मृत्यू प्रकरणी स्थापन केलेल्या साळुंखे समितीच्या शिफारशींच्या अनुषंगाने प्रकल्प अधिकारी, नागपूर, नायब तहसिलदार, कारंजा व तालुका आरोग्य अधिकारी यांनी सदर शाळेला भेट देऊन आकाश काडमु बेठेकर या विद्यार्थ्याच्या मृत्यू संदर्भात चौकशी केली आहे. तसेच सदर विद्यार्थ्याच्या पालकांच्या भेटीकरीता प्रकल्प अधिकारी, नागपूर व शिक्षण विस्तार अधिकारी, नागपूर यांनी

विद्यार्थ्याच्या गावाला प्रत्यक्ष भेट दिली असता शालेय प्रशासनाविषयी आपली कोणत्याही प्रकारची तक्रार नाही असे विद्यार्थ्याच्या वडिलांनी तसेच त्या गावातील इतर विद्यार्थ्यांच्या पालकांनी सांगितले.

(३) प्रकल्प अधिकारी, नागपूर, नायब तहसिलदार, कारंजा व तालुका आरोग्य अधिकारी यांनी सदर शाळेला दिलेल्या भेटीत निदर्शनास आलेल्या त्रुटींची पूर्तता करण्याबाबत मौखिक व कार्यालयीन भेट रजिस्टरमध्ये नोंदवून सूचना देण्यात आल्या होत्या. सदर त्रुटींची पूर्तता झाली किंवा नाही याबाबतचा अहवाल शालेय प्रशासनाकडून प्राप्त न झाल्याने मुख्याध्यापक, आश्रमशाळा नारा यांचेकडून प्रशासकीय कारवाई का करण्यात येऊ नये याबाबत खुलासा दि.०६.०३.२०१७ अन्वये मागविण्यात आलेला आहे. खुलासा प्राप्त झाल्यावर त्यानुसार उचित कार्यवाही करण्यात येणार आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मौजे अभाणपूर (ता. शहादा, जि.नंदुरबार) येथे नवीन वीज ट्रान्सफार्मर आणि पथदिवे लावण्यास मंजुरी देणेबाबत

**(१२) * ७८६४२ श्री.राजाभाऊ (पराग) वाजे (सिन्नर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे अभाणपूर (ता. शहादा, जि.नंदुरबार) या १००% आदिवासी गावात ग्रामपंचायतीने नवीन वीज ट्रान्सफॉर्मर व विद्युत पथदिवे मंजूर करण्यासाठी वारंवार संबंधित कार्यालयाकडे लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत लोकप्रतिनिधींनी दिनांक ०४ जानेवारी, २०१७ रोजी वा त्या सुमारास मा. ऊर्जा मंत्री यांचेकडे देखील लेखी पत्राद्वारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने नवीन वीज ट्रान्सफॉर्मर व विद्युत पथदिवे मंजूर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे आहे.

(२) हे ही खरे आहे.

(३) मौजे अभाणपूर ता. शहादा येथे नविन वीज ट्रान्सफॉर्मर व पथदिवे उभारणीसाठी दि.१२.०८.२०१६ रोजी महावितरणच्या शहादा विभागाचे पत्र क्र. EE/SHD/T/DPDC(G)/०३ अन्वये तांत्रिक अंदाजपत्रक मंजूर करण्यात आलेले आहे. सदर मंजूर कामाचा समावेश जिल्हा नियोजन आराखडयात (२०१६-१७) मंजूर निधी अंतर्गत करण्यात आलेला आहे. तसेच सदर कामांची निविदा मंडळस्तरावर प्रसारित करण्यात आलेली असून निविदा प्रक्रिया पूर्ण होताच कामे हाती घेण्यात येतील.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सहायक निबंधक, सहकारी संस्था चांदूर बाजार (जि. अमरावती) यांनी कर्जमाफी योजनेत केलेल्या गैरव्यवहाराबाबत

**(१३) * ७७८१२ श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सहायक निबंधक सहकारी संस्था, चांदूर बाजार (जि. अमरावती) श्री.बलिंगे यांचेविरुद्ध कर्जमाफी योजनेत ६५ लाखांपेक्षा जास्त रकमेचा गैरव्यवहार केल्याबद्दल चांदूरबाजार पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल झालेला असल्याने त्यांना निलंबित करण्यात यावे, असा प्रस्ताव सहकार आयुक्तांनी शासनाकडे दिनांक १९ नोव्हेंबर,२०१६ तसेच ८ डिसेंबर,२०१६ रोजी वा त्यासुमारास सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रस्तावावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख :** (१) होय.

(२) श्री. के. एस. बलिंगे, सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, चांदुर बाजार यांच्याविरुध्द पोलीस स्टेशन चांदुरबाजार येथे दिनांक ६/०८/२०१६ रोजी प्रथम खबरी अहवाल नोंदविला असून त्यांच्याविरूद्ध भारतीय दंडसंहिता १८६० चे

कलम ४२०, ४६७,४६८,४७१,४०९ ,१२०८ व ३४ अन्वये दि. ६/८/२०१६ रोजी गुन्हा नोंदविण्यात आला. त्याअनुषंगाने श्री. बलिंगे यांना दि. ८/०३/२०१७ च्या आदेशान्वये निलंबीत केले आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**अहमदनगर एमआयडीसी परिसरातील वखार महामंडळाच्या आवारातून ४६० गव्हाच्या गोण्यांसह ट्रक चोरीला गेल्याबाबत**

**(१४) * ७६९५० श्री.विजय औटी (पारनेर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदनगर एमआयडीसी परिसरातील वखार महामंडळाच्या आवारातून ४६० गव्हाच्या गोण्यांसह ट्रक चोरीला गेल्याची घटना दिनांक १ जानेवारी, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी शसनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीअंती दोर्षीविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) सदर प्रकरणी एमआयडीसी पो.स्टे. येथे गु.र.नं. १/२०१७ भा.दं.वि. कलम ३७९ प्रमाणे गुन्हा दाखल केलेला आहे. चोरीस गेलेल्या माला पैकी ट्रक मिळून आलेला आहे. सदर मिळून आलेला ट्रक हा मा. न्यायालयाचे आदेशाने ट्रक मालकाच्या ताब्यात देण्यात आलेला आहे. सदर गुन्ह्यातील आरोपी अटक करणेकरीता हद्दीत वेळोवेळी नाकाबंदीचे आयोजन करुन अशा प्रकारचे गुन्हे करणारे गुन्हेगारांना चेक करण्यात आले आहे.

(४) विलंब झालेला नाही.

-----------------

## पाताळगंगा एमआयडीसीतील सांडपाण्यामुळे मौजे कासप या गावातील शेत जमिन नापिक झाली असल्याबाबत

**(१५) * ७९३७५ श्री.मनोहर भोईर (उरण) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अतिरिक्त पाताळगंगा एमआयडीसी विभागातील मौजे कासप गावातील शेत जमिनीत गेले अनेक वर्षापासून सांडपाणी जात असल्याने जमिनी नापिक झाली असून नुकसान भरपाई देण्याबाबत उप अभियंता, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, ता. पनवेल यांना दिनांक १९ जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास ग्रामस्थांनी निवेदन दिले आहे,हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई :** (१) होय. हे खरे आहे.

(२) उप अभियंता, पाताळगंगा यांनी सदर शेतांच्या नुकसान भरपाईकरिता संबंधित तलाठी व कृषी अधिकारी यांचे मार्फत पंचनामा करुन शेतीच्या नुकसानी बाबत अभिप्राय कळविण्याची तहसिलदार यांना विनंती केली असून त्यांच्याकडून अहवाल प्राप्त झाल्यानंतर पुढील कार्यवाही करण्यात येणार आहे. तसेच कासप ग्रामस्थांच्या निवेदनाच्या अनुषंगाने महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाने अतिरिक्त पाताळगंगा येथील २ कंपन्यांना दिनांक ०७/०३/२०१७ रोजी कारणे दाखवा नोटीस बजावली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## फॉक्सकॉन कंपनीने राज्यात गुंतवणुक करण्यास नकार दिल्याबाबत

**(१६) * ७४८०२ श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अमित देशमुख (लातूर शहर) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) फॉक्सकॉन कंपनीने महाराष्ट्रात ५ अब्ज डॉलर्स गुंतवणूक करुन ॲपलचे आयफोन आणि आयपॅड बनविण्याचा तसेच ५० हजार रोजगार निर्मिती

करण्याचा गुंतवणूक करार करुनही गुंतवणुकीस नकार दिल्याची बाब उद्योग सचिवांनी माहे नोव्हेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान उघड केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय.

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार उद्योग वाढीसाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई :** (१) नाही.

(२), (३) व (४) मे. फॉक्सकॉन कंपनीचे प्रतिनिधीचे शिष्टमंडळ नुकतेच जानेवारी, २०१७ मध्ये राज्यात भेटीसाठी येवून गेले आहेत. घटकामार्फत राज्यात उद्योगस्थापनेकरीता सुनियोजित ठिकाण व प्रोत्साहने याबाबत राज्य शासन स्तरावर चर्चा चालू आहे प्रस्तूत विषयी चर्चेअंती सकारात्मक प्रतिसादाबाबत प्रयत्न करण्यात येत आहेत. देशांतर्गत सर्व राज्यांनी "व्यवसाय करणे सोपे" Ease of Doing Business च्या माध्यमातून मोठया प्रमाणावर सुधारणा केल्या आहेत. परिणाम: सर्व राज्य उद्योग आकर्षित करण्यासाठी उद्योग समूहांना विविध प्रोत्साहने देवू करत आहेत. यास्तव राज्यांतर्गत निकोप स्पर्धात्मक वातावरणात एखाद्या उद्योगाने कोणत्या ठिकाणी उद्योग सुरु करावा हा निर्णय सर्वस्वी त्या उद्योजकाचा असल्याने राज्य शासन याबाबत सकारात्मक चर्चा करुन प्रयत्नशिल आहे.

-----------------

## अदानी कंपनीच्या राखेमुळे मलपूरी (ता.तिरोडा, जि.गोंदीया) गावातील शेतीपिकांचे नुकसान होत असल्याबाबत

**(१७) * ८३६३२ श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तिरोडा (जि.गोंदिया) तालुक्यातील अदानी विद्युत प्रकल्पाला लागून मलपूरी हे गाव असून या गावातील अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या शेताच्या बाजूला प्रकल्पातील राख टाकण्यात आल्यामुळे पिकांचे लाखो रूपयांचे नुकसान झाल्याचे दिनांक १० फेब्रुवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) होय, हे खरे आहे,

मौजे मलपूरी येथील गट क्र. १८६/२ च्या जमीनधारकानी माहे मे, २०१६ मध्ये तालुका स्तरीय तक्रार निवारण समितीकडे केली होती.
(२) व (३) सदस्य सचिव, तालुका स्तरीय तक्रार निवारण समिती, तिरोडा यांनी नुकसानीची चौकशी करुन मूल्यांकन निश्चित केले. त्यानुसार अदानी कंपनीने मूल्यांकनाच्या रकमेचा धनादेश विस्तार अधिकारी कृषि तथा सदस्य सचिव, तालुका निवारण समिती, तिरोडा यांना दि. १४ मार्च, २०१७ रोजी दिला आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## दौंड (जि. पुणे) परिसरातील शेतीपंपाची इन्फ्रा २ अंतर्गत नवीन मंजूर कामे प्रलंबित असल्याबाबत

**(१८) * ८००१२ श्री.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) दौंड (जि. पुणे) परिसरातील इन्फ्रा २ अंतर्गतची सन २०१४-१५ व २०१५-१६ मंजूर झालेली नवीन शेतीपंप, पथदिवे, नवीन रोहित्र इत्यादी स्थापित करणे, जुने रोहित्र दुरुस्ती, जीर्ण झालेले विद्युत खांब बदलणे आदी कामे अद्याप प्रलंबित आहेत, हे खरे आहे काय,
(२) तसेच उक्त परिसरात फ्युज पेट्या अनेक ठिकाणी अनच्छादित असल्यामुळे कर्मचा-यांच्या व नागरिकांच्या जीवितास धोका निर्माण झाला असून उक्त कामे पूर्ण करण्यासंदर्भात स्थानिक लोकप्रतीनिधिंनी माहे ऑक्टोबर, २०१५ पासून महावितरण कार्यालयास वेळोवेळी पत्रव्यवहार केला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रलंबित कामे पूर्ण करण्यासाठी आवश्यक निधीची तरतूद करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१), (२) व (३) दौंड (जि.पुणे) तालुक्यात इन्फ्रा २ योजनेअंतर्गत शेतीपंपासाठी लागणाऱ्या नवीन रोहित्र, एचटी व एलटी लाईनच्या कामाचा समावेश होता. ती सर्व कामे सन २०१४-१५ ते २०१६-१७ या कालावधीत पूर्ण झाली असून २५२७ शेतीपंपाना वीज कनेक्शन देण्यात आले आहे.

जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत सन २०१६-१७ मध्ये पुणे जिल्हयाकरिता रु. १०.८५ कोटी इतका निधी मंजूर असून सदर योजनेमध्ये कृषीपंप ऊर्जीकरण, घरगुती तसेच औद्योगिक ग्राहकांना वीजजोडणी देणे व पथदिवे ऊर्जीकरणाची कामे करण्यात येत आहेत.

पथ दिवे तसेच सामान्य विकास व पध्दती सुधारणा कामासाठी जिल्हा विकास व नियोजन समितीकडून रु. १.८० कोटीचा निधी दौंड तालुक्या करिता उपलब्ध झाला आहे. त्यामधून दौंड तालुक्यातील ११ गावांच्या कामांचे कार्यादेश देण्यात आले असून त्यापैकी ५ गावांची कामे पूर्ण झाली असून उर्वरित ६ गावांची कामे प्रगतीपथावर आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

**नागपूरच्या बूटीबोरी व हिंगणा औद्योगिक क्षेत्रातील उद्योजकांच्या मागण्यांबाबत**

**(१९) * ७८५१२ श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमर काळे (आर्वी) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुटीबोरी हिंगणा (नागपूर) या औद्योगिक क्षेत्रात विजेचे दर कमी करण्याच्या घोषणेची अंमलबजावणी न करणे, विकास शुल्काची अयोग्य आकारणी, सदोष वीजप्रणाली, पूरक उद्योगाचा अभाव, ग्रामपंचायतींची कर आकारणी, कौशल्य विकासाचा अभाव, अनेक परवाने घ्यावे लागणे इत्यादी अनेक कारणांमुळे उद्योजकांनी उद्योग सुरु केले नसल्यामुळे या क्षेत्राचा परिपूर्ण विकास झालेला नसल्याची बाब माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत मा.विरोधी पक्षनेता, विधानसभा यांनी मा.उद्योग मंत्री यांना दिनांक १४ जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास पत्राद्वारे उद्योजकांच्या

मागण्यांच्या अनुषंगाने कार्यवाही करण्याची विनंती केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई :** (१) हे खरे नाही.

विदर्भ, मराठवाडा या औद्योगिक दृष्ट्या कमी विकसित क्षेत्रात उद्योग आकर्षित करण्यासाठी सामुहिक प्रोत्साहन योजनेव्दारे विविध प्रोत्साहने देण्यात येतात. त्यामध्ये १००% ग्रॉस व्हॅट वर आधारित प्रोत्साहने, १००% मुद्रांक शुल्क माफी व १५ वर्ष विद्युत शुल्क माफी देण्यात येत आहे. नुकताच विदर्भ मराठवाडा क्षेत्रातील उद्योगांना अनुदान उपभोगण्याचा कालावधी ५ वर्ष (अथवा ५०% पात्र भांडवलाची प्रतिपूर्ती ह्या मर्यादेत) वाढविण्यात आला आहे. गत वर्ष २०१६ व चालू वर्ष २०१७ मध्ये एकूण ११ विशाल प्रकल्प विदर्भात येवू लागले असून, त्याव्दारे एकूण ४८४०.९६ कोटी गुंतवणूक व १६८८६ रोजगार निर्मिती अपेक्षित आहे.

विदर्भ, मराठवाडा विभागातील उद्योगांना इतर विभागातील उद्योगांच्या तुलनेत येणाऱ्या अडचणी, उपलब्ध होणारी वीज व त्याचा दर तसेच उद्योग क्षेत्रात विकास जलदगतीने होण्यासाठी प्रचलीत वीज दराचा अन्य भागातील वीज दराशी तुलनात्मक अभ्यास करुन विदर्भ, मराठवाडा, उत्तर महाराष्ट्र, D व D+ क्षेत्रातील औद्योगिक ग्राहकांना वीज दरात सवलत देण्याचा निर्णय झाला असून त्यानुसार १) इंधन समायोजन आकार सवलत २) उद्योगांच्या कार्यक्षमतेवर आधारित सवलत ३)नवीन उद्योगांकरिता प्रोत्साहनपर सवलत अशा प्रकारच्या सवलती देण्यात येत आहेत. त्याचप्रमाणे बुटीबोरी व हिंगणा औद्योगिक क्षेत्रातील सर्व औद्योगिक ग्राहकांना सुरळीत वीजपुरवठा करण्याकरिता १३ उपकेंद्राद्वारे वीज पुरवठा सुरु असून दिनदयाल उपाध्याय ग्राम ज्योत योजनेअंतर्गत ५ नवीन २x५ एमव्हीए क्षमतेची उपकेंद्रे उभारण्याचे काम सुरु आहे.याव्यतिरिक्त अतिरिक्त इंन्फ्रा-२ योजनेअंतर्गत ५ उपकेंद्रांची उभारणी करण्याचे काम प्रस्तावित करण्यात आले आहे.

तसेच विकास शुल्काची आकारणी महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिकारी १९६६ मधील कलम १२४ ( पी ) मधील तरतुदीनुसार शासनाने मंजूर केलेल्या दराप्रमाणे करण्यात येते. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ क्षेत्रात जमीनीचा विकास करतांना विकास शुल्काची आकारणी महामंडळाच्या दि. २०/१०/२०११ परिपत्रकानुसार बाजारमुल्य दराच्या ०.५ टक्के व इमारतीचा विकास करतांना बाजारमुल्य दराच्या २ टक्के आकारण्यांत येत होती. तथापि, सदर दर कमी करुन दि. १३/०१/२०१५ परिपत्रकान्वये विकास शुल्क आकारणी जमीनीचा विकास करतांना बाजारमुल्य दराच्या ०.३ टक्के व इमारतीचा विकास करतांना बाजारमुल्य दराच्या १ टक्के आकारण्यांत येते व त्याप्रमाणे विकास शुल्काची आकारणी योग्य रीत्या करण्यात येते.

(२) होय. हे खरे आहे.

(३) उद्योजकांशी चर्चा करुन विविध मागण्यांच्या अनुषंगाने महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या स्तरावर कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## शहापूर (जि.ठाणे) तालुक्यातील शेतकऱ्यांच्या सुपीक जमिनीवर वीजवाहिन्यांसाठी टॉवर टाकण्यात येत असल्याबाबत

**(२०) * ७६८०३ श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.बळीराम सिरसकर (बाळापूर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शहापूर (जि.ठाणे) तालुक्यातील ग्रामीण भागातून पॉवर ग्रीड कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लि.च्या वीजवाहीनीला आवश्यक असलेले टॉवर बांधणाऱ्या कंपनीने शेतकऱ्यांची नाहरकत न घेताच सुपीक जमिनीवर टॉवर टाकण्याचे काम सुरु केल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीअंती काय निदशर्नास आले व तद्नुसार शेतकऱ्यांची संमती न घेताच सुपीक जमिनीत टॉवर टाकणाऱ्या कंपनीवर कोणत्या प्रकारची कारवाई केली व करण्यात येत आहे,

(४) तसेच शेतकऱ्यांच्या सुपीक जमिनी वाचविण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) ,(२) व (३) पॉवर ग्रीड कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लि. (भारत सरकार उपक्रम) कंपनीमार्फत ७६५ के.व्ही. औरंगाबाद-पडघे अति उच्चदाब वाहिनी तसेच ४०० के.व्ही. पडघे-पडघे या अति उच्चदाब वाहिनी व मनोरे उभारणीसाठी वीज अधिनियम २००३ च्या कलम ६८ अन्वये केंद्र शासनाने मंजुरी देलेली आहे. तसेच भारतीय तार अधिनियम १८८५ चे कलम १० व १६ (१) अंतर्गत असलेल्या अधिकाराचा वापर करुन जिल्हाधिकारी, ठाणे यांनी सदर उच्च दाब वाहिनी/मनोरा उभारणी कामाच्या अनुषंगाने सदर कामात अडथळा न आणण्याबाबत व नुकसानग्रस्त संबंधित जमीन मालकांना/शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देणेबाबत आदेश निर्गमित केले आहेत.

(४) विद्युत वाहिन्या व मनोरे यामुळे होणाऱ्या नुकसानीची भरपाई व मोबदला, शासनाच्या प्रचलित नियमानुसार काही जमिनधारकांना देण्यात आला असून उर्वरितांच्या बाबतीत पुढील कार्यवाही सुरु आहे.

-----------------

## राज्यातील शासकीय व अनुदानित आश्रमशाळेतील शिक्षक व शिक्षकेत्तर पदे भरण्याबाबत

**(२१) * ८४२४० श्री.राजन साळवी (राजापूर), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी), श्री.सुनिल शिंदे (वरळी) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील १,१०९ शासकीय व अनुदानित आश्रमशाळेतील शिक्षक व शिक्षकेतर पदे मोठ्या प्रमाणावर रिक्त असल्याची बाब माहे फेब्रुवारी, २०१७ मध्ये वा दरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने चौकशी केली आहे काय,सदर चौकशीत काय निष्पन्न झाले आहे,

(३) तसेच राज्यातील आश्रमशाळेतील शिक्षक व शिक्षकेतर रिक्त पदे त्वरीत भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) अंशत: खरे आहे.

सद्य:स्थितीत आदिवासी विकास विभागांतर्गत ५२९ शासकीय व ५४६ अनुदानित आश्रमशाळा अशा एकूण १०७५ शासकीय व अनुदानित आश्रमशाळा कार्यरत आहेत.

जानेवारी-२०१७ अखेर शासकीय व अनुदानित आश्रमशाळांमध्ये शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची ३१४८५ मंजूर पदे असून, त्यापैकी २५७२९ पदे भरलेली आहेत व ५८०६ पदे रिक्त आहेत.

(२) शासकीय आश्रमशाळांमधील मंजुर, भरलेल्या रिक्त पदांचा दर तिमाही अखेर आढावा घेण्यात येतो.

त्यामधून रिक्त पदांचा बोध होतो. त्यानूसार, रिक्त पद भरती बाबत वेळोवेळी निर्देश देण्यात आलेले आहेत. त्यामुळे, चौकशीचा प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची पदे भरण्याकरीता अपर आयुक्त, आदिवासी विकास हे नियुक्ती प्राधिकारी असून, सदर रिक्त पदे तातडीने भरण्याबाबत अपर आयुक्तांना निर्देश देण्यात आलेले असून, यानुषंगाने अपर आयुक्त, आदिवासी विकास यांच्यास्तरावर नियमोचित कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**महाराष्ट्र राज्य सहकारी ग्राहक संघ मर्यादित या संस्थेतील गैरकाराभाराबाबत**

**(२२) * ८१४०५ श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य सहकारी ग्राहक संघ मर्यादित या संस्थेतील गैरकाराभाराची चौकशी करण्यासंदर्भात पणन संचालक, पुणे यांनी दिनांक १६ जून, २०१६ रोजी वा त्या सुमारास निर्देश दिले होते सदर निर्देशानंतरही ग्राहक संघाने शासनाच्या विविध विभागांना विविध वस्तुच्या पुरवठ्याचे काम सलग्न सदस्य संस्थाना न देता खाजगी पुरवठा धारकांना दिल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बेकायदेशीर पुरवठ्याच्या देयकाची जबाबदारी निश्चित करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, संघाकडून वस्तूच्या पुरवठ्याचे काम देताना सेवाशुल्क आकारणी तसेच ई-टेंडरींग बाबतही वर्तमानपत्रामध्ये कोणत्याही प्रकारची जाहिरात देण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर ग्राहक संघाच्या स्थापनेस ५० वर्षापेक्षा अधिक कालावधी होऊनही कर्मचारी वर्गाचा आकृतीबंध मंजूर केलेला नाही तसेच संघाचा कारभार सहकार क्षेत्राच्या मूळ तत्वांशी विसंगत असल्याचे चौकशी समितीच्या अहवाल नमूद केले आहे, हे खरे आहे काय,

(५) असल्यास, चौकशी समितीच्या अहवालानुसार संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. सुभाष देशमुख :** (१) हे खरे नाही.

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७९ अ अ अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारानुसार पणन संचालक पुणे, यांनी शासनाच्या विविध विभागांना वस्तूंचा पुरवठ्याचे काम करण्यासाठी संलग्न सभासद संस्थांना सर्वोच्य प्राधान्य द्यावे व यासाठी आवश्यक ती नियमावली तयार करुन निबंधकांची मान्यता घेण्याचे निर्देश ग्राहक संघास दिले आहेत.तद्नंतर ग्राहक महासंघाने खाजगी पुरवठा धारकांना पुरवठा आदेश दिले नाहीत.

(२) नाही.

(३) नाही.

(४) ग्राहक संघाच्या कर्मचारी वर्गाचा आकृतीबंध मंजूर नाही,हे खरे आहे.

(५) पणन संचालक, पुणे यांच्या निर्देशा- विरुध्द ग्राहक महासंघ मुंबई या संस्थेने मा. मंत्री(पणन) यांचेसमोर पुनर्रिक्षण अर्ज क्र. ६८३/२०१६ सादर केला आहे. सदर पुनर्रिक्षण अर्ज अमान्य करण्यात आला असून, पणन संचालक, पुणे यांचे निर्देश कायम ठेवण्यात आले आहेत. तसेच अन्य पुनर्रिक्षण अर्ज क्र. ७४१/२०१६ कार्यवाहीसाठी प्रलंबित आहे.

-----------------

**विधान भवन**
**मुंबई**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव**
**महाराष्ट्र विधानसभा**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.